महाराष्ट्र जनशक्ती

ई-पेपर (पीडीएफ) आवृत्ती व्हॉट्सअप आणि सोशल मीडियावर शेअर करण्यास परवानगी आहे!

महाराष्ट्रातील प्रत्येक तालुक्यात प्रतिनिधी नेमणे आहे. बातम्या व जाहिराती ७५८८००५००२ या नंबरवर व्हाट्सॲप करा.

महाराष्ट्रातील जनसामान्यांच्या न्याय्य व हक्कासाठी लढणारी शक्ती

# महाराष्ट्र जनशक्ती

मुख्य संपादक : प्राचार्य डॉ. हसन इनामदार




छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) | वर्ष : दुसरे | अंक : २५८ वा | दिनांक : १०/०८/२०२५ | वार : रविवार

## राहुल गांधींच्या खुलाशानंतर भाजपवर तोंड लपवण्याची वेळ - संजय राऊत



**मुंबई :** लोकशाहीमध्ये तोंड लपवण्याची वेळ भाजपवर आली आहे. ५० मतदारसंघात भाजपचे उमेदवार कसे विजयी झाले हे राहुल गांधींनी काल पुराव्यासह दाखवले आहे. राहुल गांधींनी टाकलेल्या बॉम्बमुळे यांच्या अब्रूच्या चिंधड्या उडाल्या आहेत, हे कसले खुलासे करत आहे, जे झाले हे स्पष्ट आहे, असे उबाठाचे नेते संजय राऊत यांनी म्हटले आहे.

खासदार संजय राऊत म्हणाले की, उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांची जी युती आहे. हा इंडिया आघाडीचा विषय नाही. तो स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीचा विषय आहे. या निवडणुकीची राष्ट्रीय स्तरावर कधी चर्चा होत नाही, मग समोर महायुती असो की एनडीए. काही लोकांचे पक्षप्रमुख दिल्लीत असल्याने ते दिल्लीत जाऊन चर्चा करत असतील पण ठाकरे बंधूंच्या एकत्र येण्याचा विषयाचा आणि आघाडीचा काही संबंध आणि आक्षेप नाही.

खासदार संजय राऊत म्हणाले की, मराठीच्या प्रश्नावर महाराष्ट्र काँग्रेसची आणि आमची भूमिका एकच आहे. राजकीय दृष्टीने ठाकरे बंधू एकत्र आले याचा केंद्र बिंदू मराठी हाच आहे. शरद पवार असोत की हर्षवर्धन सपकाळ यांची भूमिका एकच आहे. आमच्यामध्ये मतभेद नाही. मुंबई वाचवण्यासाठी जर ठाकरे बंधूंनी घेतलेली भूमिका ही मराठी माणसांसाठी आनंदाची आहे. मनसेने परप्रांतीयांविरोधात भूमिका घेतलेली नाही.कधी काळी आमच्या विरोधातही हे आरोप होत होते. बंगालमध्ये तिथल्या भाषेसाठी आंदोलन सुरू आहे. तामिळनाडू मध्येही हे आंदोलन सुरू आहे तुम्ही महाराष्ट्रा वरच का आक्षेप घेत आहात? मराठी बोलणार नाही हे सांगितले की लोकांचा भडका उठतो.

खासदार संजय राऊत म्हणाले की, मविआ ही विधानसभा तर इंडिया आघाडी लोकसभा निवडणुकीसाठी तयार करण्यात आली. स्थानिक स्वराज्य संस्थांसाठी अशी आघाडी तयार झालेली नाही.प्रत्येक मनपा, जिल्हा परिषदेच्या निवडणुकीसाठी स्थानिक आघाड्या निर्माण केल्या जातात त्यात कधी-कधी राजकीय पक्षही नसतात. त्यामुळे ह्या निवडणुकीचे अधिकार स्थानिक पदाधिकाऱ्यांना असतात. मुंबईचा निर्णय उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे घेतील.

खासदार संजय राऊत म्हणाले की, राहुल गांधी यांनी आमंत्रण दिल्यानुसार उद्धव ठाकरे सहकुटुंब दिल्ली दौऱ्यावर आले होते. राहुल गांधी यांचे प्रेझेंटेशन दुपारीच झाले होते मात्र आदित्य ठाकरेंनी केलेल्या विनंतीनंतर त्यांनी पुन्हा प्रेझेंटेशन केले. प्रेझेंटेशन उत्तम दिसत होते तिथे शेवटच्या रांगेत बसून आम्ही ते पाहिले. देवेंद्र फडणवीस यांनी आम्हाला अक्कल शिकवू नये. बाळासाहेब ठाकरेंचे संघटन फोडत शहा यांच्या पायाशी नजराणा पाठवला त्यांनी आम्हाला शिकवू नये. आम्ही आमच्या अटीवर दिल्लीचे राजकारण करतो. तुम्ही आमचा अपमान करण्याचा प्रयत्न केला म्हणून आम्ही वेगळी भूमिका घेतली.

खासदार संजय राऊत म्हणाले की, प्रेझेंटेशन झाल्यानंतर रश्मी ठाकरे, सोनिया गांधी, कमल हसन, खर्गे हे सर्व एका टेबलवर होते. मी आणि आदित्य ठाकरे हे राहुल गांधी यांच्यासोबत बसून स्नेहभोजन केले. यानंतर उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे यांच्यासह आम्ही राहुल गांधींसोबत महाराष्ट्रातील राज कारणासह अनेक प्रमुख विषयावर चर्चा केली. काही घडामोडी देशामध्ये घडू शकतील हे आम्ही त्याच अनुषंगाने बोलत आहोत.

## ते दोन लोक कोण? जनतेसमोर आणा : रावसाहेब दानवे



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी विधानसभा निवडणुकीबाबत धक्कादायक दावा करत महाराष्ट्राच्या राजकारणात खळबळ उडवून दिली आहे. त्यांनी विधानसभा निवडणुकीसंदर्भात एक मोठा गौप्यस्फोट केल्याने राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. तर शरद पवारांना भेटायला आलेले दोन लोक अधिकारी नसून सर्वेक्षण करणाऱ्या एजन्सीचे लोक होते. असे रावसाहेब दानवे यांनी म्हटले आहे. तसेच खरोखरच दोन अधिकारी त्यांच्या भेटीस आले होते, तर त्यांची नावे जाहीर करावीत, असे आव्हानही दानवे यांनी शरद पवारांना दिले.

काँग्रेस नेते राहुल गांधी सतत निवडणूक आयोगावर आरोप करत असतानाच, शरद पवार यांनी नुकतेच म्हटले आहे की, "विधानसभा निवडणुकीपूर्वी दोन व्यक्ती मला भेटायला आल्या होत्या. त्यांनी मला २८८ पैकी १६० जागा निवडून आणण्याची गॅरंटी दिली होती. मतांची फेरफार करण्याबाबत ते माझ्याशी बोलत होते." आता भाजपचे नेते आणि माजी मंत्री रावसाहेब दानवे यांनी शरद पवारांच्या आरोपांना दिले प्रत्युत्तर दिले आहे.

रावसाहेब दानवे म्हणाले की, विधानसभा निवडणुकीचा निकाल लागून सहा महिने झाले आहेत, पण महाविकास आघाडीला तो अजूनही पचवता आलेला नाही. ईव्हीएम, मतदार यादी आणि मतदारांच्या वाढीबद्दल यापूर्वीही आरोप केले गेले होते, आणि आता हा चौथा आरोप आहे.

दानवे पुढे म्हणाले, "शरद पवार ज्येष्ठ नेते आहेत, पण त्यांनी केलेल्या या आरोपांमुळे राज्यातील जनतेचा अपमान झाला आहे. हे आरोप बिनबुडाचे आणि तथ्यहीन आहेत. त्यांनी ज्या दोन व्यक्तींचा उल्लेख केला आहे, त्यांची ओळख जाहीर करावी. आजकाल सर्वांच्या घरात कॅमेरे आहेत, त्यामुळे ते अधिकारी कोण आहेत, हे त्यांनी जनतेसमोर आणावे."

रावसाहेब दानवे यांनी शरद पवारांच्या आरोपांवर स्पष्टीकरण देताना सांगितले की, "निवडणुकीच्या वेळी अनेक सर्वे एजन्सी येतात आणि आम्ही तुम्हाला इतक्या जागा जिंकून देतो, असे सांगतात. हे लोक उमेदवारांनाही भेटतात. त्यामुळे पवारांनी उल्लेख केलेले ते दोन लोक अधिकारी नसून सर्व एजन्सीचे प्रतिनिधी असू शकतात. हे लोक आमच्याकडे लोकसभेला सुद्धा आले आणि विधानसभेला सुद्धा ते आले होते."

शरद पवारांनी जो काही आरोप केला तो बिनबुडाचा आहे. तथ्यहीन आहे, या राज्यातील जनतेचा अपमान करणारे हे आरोप आहेत, त्यांच्या आरोपांमध्ये काहीही तथ्य नाही. हे सगळे अधिकारी नसून सर्व एजन्सी वाले लोक आहेत. जर ते खरोखरच अधिकारी असतील आणि त्यामागे सरकारला लक्ष्य करण्याचा प्रयत्न असेल, तर पवारांनी त्यांचा खुलासा करावा, असे आव्हानही रावसाहेब दानवे यांनी शरद पवार यांना दिले आहे.

## संविधान उद्ध्वस्त, न्यायव्यवस्थाही मौन : जितेंद्र आव्हाड यांचा निवडणूक आयोगावर घणाघात



**मुंबई :** संविधान उद्ध्वस्त होतंय, न्याय व्यवस्थाही गप्प बसतेय, बापाने जन्म दिलेलं मूल दुसऱ्याच्या मांडीवर बसवलं, अशा तिखट शब्दांत राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) नेते जितेंद्र आव्हाड यांनी निवडणूक आयोगावर जोरदार हल्लाबोल केला आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, मतदार याद्यांतील घोळ, पक्षांतर बंदी कायद्याचा गैरवापर, निवडणूक आयोगाच्या नियुक्ती प्रक्रियेत झालेला बदल आणि न्यायालयाच्या भूमिकेवर त्यांनी थेट सवाल उपस्थित केला. राहुल गांधी कुठे काय बोलले यावर सुप्रीम कोर्ट प्रश्न विचारतं, पण संविधानाच्या पायदळी तुडवले जातंय यावर मात्र मौन बाळगतं, अशी टीका करत त्यांनी सर्वोच्च न्यायालयाच्या भूमिका देखील लक्षवेधी ठरली आहे. देशात लोकशाही संपवण्याचे काम सुरू असून, येत्या काही वर्षांत लोकशाहीचा मूळ गाभा उध्वस्त होईल, असा इशाराही त्यांनी दिला. निवडणूक आयोग हा भाजपचा हस्तक झाल्याचा आरोप करत त्यांनी आयोगाच्या भूमिकेवर गंभीर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, कोण तो राम कमल दास यांना ८० पोरं आहेत म्हणे, मी थोडासा विचार केला तर त्याच्या पत्नीला एका वर्षात ३ पोरं झाली आहेत, हे शक्य आहे. त्यांची जाहिरात तुम्ही लोकांनी केले पाहिजे.

जितेंद्र आव्हाड म्हणाले की, देशात लोकशाही संपवण्याचे काम सुरू आहे. जर एका पक्षाचा पदाधिकारी उच्च न्यायालयाचा न्यायाधीश बनणार असेल, तर इतर संस्थांप्रमाणे न्याय व्यवस्थाही शांत केली जाईल. त्यांनी आरोप केला की, पुढच्या २० वर्षांत देशात लोकशाही राहणार नाही. बुलढाण्यातील मतदार यादीतील घोळाचा संदर्भ देत ते म्हणाले की, राहुल गांधी यांनी अभ्यासाअंती हा घोटाळा उघडकीस आणला आहे. महाराष्ट्रात ७६ लाख मतं वाढली आणि मतदानाच्या टक्केवारीत शेवटच्या क्षणी झालेली वाढ यावर आपण २०२४ पासून बोलत आहोत, पण निवडणूक आयोगाने एकाही प्रश्नाचे उत्तर दिले नाही, असेही त्यांनी सांगितले.

पक्षांतर बंदी कायद्या बद्दल बोलताना आव्हाड म्हणाले की, निवडणूक आयोगाने संविधान पायदळी तुडवले. पक्षांतर बंदी कायदा मजबूत असतानाही, आयोगाने मूळ पक्ष सोडून गेलेल्या आमदारांना दुसऱ्या पक्षाचे अस्तित्व मान्य केले. ज्या बापाने पोराला जन्म दिला, त्याच्याकडून पोराला काढून घेत दुसऱ्याच्या मांडीवर बसवण्याचे काम आयोगाने केले आहे, अशा शब्दांत त्यांनी निवडणूक आयोगावर टीका केली.

निवडणूक आयोगाच्या आयुक्तांच्या निवडी वरही आव्हाड यांनी प्रश्न उपस्थित केला. सुप्रीम कोर्टाने निवडणूक आयुक्तांच्या निवड समितीमध्ये पंतप्रधान, विरोधी पक्षनेता आणि मुख्य न्यायाधीश असावेत, असे सांगितले होते. मात्र, लोकसभेत कायदा आणून भाजपने मुख्य न्यायाधीशांना या समितीमधून बाहेर काढले आणि त्यांच्या जागी एका मंत्र्याची निवड केली. यानंतरच हे सर्व प्रकार सुरू झाले, असा आरोप त्यांनी केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात निवडणूक आयोगाला स्वायत्तता दिली, पण आता तेच संविधान उद्ध्वस्त करण्याचे काम सुरू आहे, असेही त्यांनी म्हटले.

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५


## श्रीकृष्ण महाविद्यालयात क्रांती दिन साजरा




**उमरगा (नागसेन कांबळे) :** महात्मा गांधी हे मजबुरी का नाम गांधी नसून ,मजबुती का नाम गांधी आहेत ,शेकडो वर्ष स्थितीशील समाजाला जागृत करून जनतेच्या मनात स्वातंत्र्याचे रणशिंग फुंकणे वाटते तेवढी सोपी बाब नाही हे आपण गांधीजींचे मूल्यमापन करताना लक्षात घेतले पाहिजे. असे ठाम प्रतिपादन प्रा.डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांनी केले. तालुक्यातील गुंजोटी येथे दि.०९/०८/२०२५ रोजी ठीक ११:००वाजता श्रीकृष्ण महाविद्यालयाच्या सभागृहातील क्रांती दिनाच्या कार्यक्रमात ते बोलत होते.ते पुढे म्हणाले की स्वातंत्र्य हे आपल्याला सहजासहजी मिळालेले नसून त्यासाठी अनेकाना प्राणांची आहुती द्यावी लागली. ब्रिटिशांच्या विरोधात फार मोठी चळवळ उभी करावी लागली. स्वातंत्र्याचा हा रणसंग्राम उभा करण्याचे सर्व श्रेय निर्विवादपणे महात्मा गांधी यांना जाते यात कांहीं दुमत नसून स्वातंत्र्य चळवळीच्या लढ्याचे अनेक टप्पे त्यांनी आपल्या भाषणात सांगितली. अध्यक्षीय समारोप करताना प्राचार्य डॉ.गुलाब राठोड यांनी आजच्या दिनाचे आपल्या आयुष्यातील महत्व सांगत नारळी पौर्णिमा,राखी पौर्णिमा आणि जागतिक आदिवासी दिनाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या.कार्यक्रमाच्या सुरुवातीला महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा.डॉ.बी.भी. कुन्हाळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.डॉ.बी.जे.उगले यांनी केले. कार्यक्रमाची सांगता करण्यापूर्वी प्रत्येकांनी किमान तीन तीन झाडे लावून ते झाडे जोपासण्यासाठी सर्वांनी वृक्षारोपण केलेल्या झाडाना राखी बांधून त्याचे संवर्धन करण्याचा संकल्प सोडला. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, विद्यार्थी,शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण कार्यक्रम उपस्थित डॉ. आर. एन निगडे, डॉ.एम.जी आंबुसे, कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. जी.एम .राठोड व प्रमुख पाहुणे डॉ. उमाकांत सूर्यवंशी यांच्या उपस्थितीत पार पडला, राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

## नवद्योजक तरुणाच्या अपघातास कारणीभूत ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल



**दौलताबाद (जावेद अहमद) :** दि ०३, ऑगस्ट रोजी ऋषि सचिन चोरडिया वय २५ वर्ष राहणार अहिंसा नगर छत्रपती संभाजी नगर हा संध्याकाळी पाच वाजता हा आपल्या ऍ एस क्लब पेट्रोल पंप येथून आपली कावासाकी निन्जा दुचाकी क्र MH20HE 0009ने धुळे सोलापूर महामार्गाने जांभाळा येथील क्रेशर मशीन कडे जात असताना फतीयाबाद गावाजवळ रोडच्या दिवाइडर च्या कट मधून ट्रॅक्टरच्या चालकाने उसाने भरलेला ट्रॅक्टर क्र MH20AS 3612 ट्राली क्र MH20CH 8534 हा विरुद्ध दिशेने समोर आला यात ऋषी याची दुचाकी ट्रॅक्टर ला धडकली त्यात तो गंभीर जखमी झाला त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले वैद्यकीय अधिकारी यांनी तपासून मयत घोषित केले होते ट्रॅक्टर चालकाने दिवायडर कंट मधून आपले ट्रॅक्टर विरुद्ध दिशेने निष्काळजीपणे व हयगायीने चालुवन अपघातास कारणीभूत ठरते म्हणून ट्रॅक्टर चालका विरुद्ध ऋषी याचे काका किशोर चोरडिया यांनी तक्रार दाखल केली आहेपुढील तपास सहायक पोलिस उपनिरीक्षक रफीक पठाण हे करत आहे

## प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा, वत्सलाबाई पाटील माध्यमिक शाळेत आज क्रांती दिन, रक्षाबंधन, आदिवासी दिन साजरा



**छत्रपती संभाजीनगर :** प्रतिभाताई पाटील प्राथमिक शाळा वत्सलाबाई पाटील माध्यमिक शाळेत आज क्रांती दिन रक्षाबंधन आदिवासी दिन साजरा करण्यात आला या कार्यक्रमात महानगरपालिकेचे स्वच्छता कामगार बंधूंना स्काऊट गाईड विद्यार्थिनींनी राखी बांधून स्वागत केले त्यासोबत वर्गातील भावांना राख्या बांधल्या शाळेच्या परिसरातील वृक्षांना राखी बांधून वृक्ष रक्षणाची मुलींनी जबाबदारी घेतली यावेळी माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक शैलेंद्र पाटील सर व प्राथमिक शाळेचे श्री ढमाले सर सानप मॅडम उपस्थित होते कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ गायकवाड मॅडम यांनी केले या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक व शाळेचे विद्यार्थ्यांचा सहभाग होता







# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५


## शालेय निबंध स्पर्धेत अंजना स्कूल ऑफ एक्सीलंसच्या विद्यार्थ्यांचे यश



**दौलताबाद (जावेद अहमद) :** ऊर्जा दिनानिमित्त २३ जुन रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथे घेण्यात आलेल्या, "अक्षय ऊर्जा उत्पादन " या विषयावर घेण्यात आलेल्या निबंध स्पर्धेमध्ये अंजना स्कूल ऑफ एक्सीलंस मधील इयत्ता १० वी तील विधार्थीनी कु. अक्षरा नवनाथ कांबळे या विध्यार्थीनीने प्रथम क्रमांक मिळवला. तसेच अक्षरा ने प्रथम क्रमांक मिळवल्या बद्दल तिचे ०८ ऑगस्ट रोजी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, संभाजीनगर येथे आय. ए. एस. अधिकारी आदित्य जीवने यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.तिच्या यशाबद्दल उपाध्यक्षा मोनिका पल्हाळ, स्वर्णजीत पल्हाळ , मुख्याध्यापिका. स्नेहा पवार , व्यवस्थापक , देव साठे व शिक्षकवृंद यांनी कौतुक केले आहे

## स. भु. प्रशालेत रक्षाबंधन उत्साहात



**छत्रपती संभाजीनगर :** येथील श्री सरस्वती भुवन प्रशालेत रक्षाबंधन, वृक्षरक्षाबंधन, रक्षासूत्र उपक्रम अतिशय उत्साहात संपन्न झाला. रक्षाबंधन निमित्त प्रशालेत राखी बनवा स्पर्धा घेण्यात आली . विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या राख्या शालेय परिसरातील वृक्षांना बांधून वृक्षरक्षाबंधन साजरे करण्यात आले. तसेच शाळेतील मुलींनी मुलांना राख्या बांधून, औक्षण करून हा सण उत्साहात साजरा केला. याप्रसंगी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शालेय समितीचे अध्यक्ष ज्ञानप्रकाश मोदाणी, उपमुख्याध्यापक अनिल देशमुख, ज्येष्ठ शिक्षक जी.पी. कुलकर्णी उपस्थित होते. विद्यार्थी संसदेच्या वतीने घेण्यात आलेल्या या कार्यक्रमात प्रारंभी विद्यार्थ्यांनी रक्षाबंधन सणाचे महत्व वृक्षरक्षाबंधनाचे महत्त्व या विषयावर आपले मनोगत व्यक्त केले. त्यानंतर श्री. अनिल देशमुख यांनीही रक्षाबंधनाचा उत्तम सोहळा आयोजित केल्याबद्दल विद्यार्थी संसदेचे कौतुक केले. पर्यावरण रक्षणाचा ध्यास घेतलेले ज्ञानप्रकाश मोदाणी यांनी " प्रशालेतर्फे अत्यंत स्तुत्य आणि अविस्मरणीय असा उपक्रम घेण्यात आल्या"चे प्रतिपादन करून विद्यार्थी आणि शिक्षकांचे कौतुक केले. कार्यक्रमाच्या यशासाठी शुभांगी पांगरकर,विजय पाताळयंत्री, संध्या चोले चंद्रमा बानाटे यांनी परिश्रम घेतले.



**उमरगा (नागसेन कांबळे) :** राखी पौर्णिमेनिमित्त महाविद्यालयाच्या परिसरात वृक्षलागवड केलेल्या झाडाना राखी बांधून ते जोपासण्याचा अभिनव संकल्पाचा उपक्रम राबविताना श्रीकृष्ण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी.एम राठोड व महाविद्यालयातील सहकारी प्राध्यापक....


ADMISSION OPEN

10th, 12th and Graduate Students
Government Recognised
Job Guarantee Courses

DMLT | P.G.DMLT
X-RAY | C.T.-SCAN
E.C.G. | Radiology
Physiotherapy | Optometry
O. T. TECHNICIAN
PG Radiology

Contact : 9405109103
8830838903

मराठवाड्यातील नं. १ चे डी.टी.पी. सेंटर

साहिल कॉम्प्युटर्स अँण्ड मल्टी सर्व्हिसेस

डी.टी.पी. जॉब वर्क
एम.फिल-पी.एच.डी. थेसिस
मराठी, हिंदी, इंग्रजी
कलर प्रिंट स्कॅनिंग
झेरॉक्स
स्पायरल बायंडिग
लॅमिनेशन
थेसिस बायंडिग

विद्यापीठ गेट जवळ, जयसिंगपूरा, औरंगाबाद
8956362639, 8087880274, 9405109103

# महाराष्ट्र जनशक्ती

website: www.maharashtrajanshaktinews.com

छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शुक्रवार ८ ऑगस्ट २०२५


## आदिवासी बांधवांनी आपल्या समस्या आमच्या पर्यंत पोहचवाव्यात - आ. संजनाताई जाधव



**कन्नड (अरुण थोरात) :** आदिवासी बांधवांनी आपल्या अडचणी आमच्या पर्यंत पोहचवाव्यात असे अवाहन कन्नड च्या आमदार संजनाताई जाधव यांनी केले आहे.त्या दि. 09 ऑगस्ट रोजी चिवळी ता. कन्नड येथे आयोजित 15 व्या जागतिक आदिवासी गौरव व क्रांती दिन प्रसंगी आयोजीत कार्यक्रमात बोलत होत्या.आदिवासी समाजाने आपल्या भावी पिढीला शिक्षित करावे. विद्यार्थ्यांना लागणाऱ्या कागदपत्रांसाठी आपण गावोगावी कँप घेणार आहोत. त्याबाबत आपण आदिवासी समाजात जनजागृती करावी. जातप्रमाणपत्र, वनहक्क दावे, घरकुल साठी जागा, गायरान जमिनी उपलब्ध करुण देण्याचा प्रयत्न करु. पुढचा आदिवासी क्रांती दिन आपण कन्नड शहरात घेऊण जनतेला आदिवासी लोकसंस्कृती नृत्य गायन वादन कलेची ओळख करुण देऊ असे अवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे आयोजन गौताळा आदिवासी ठाकर समाज बहुद्देशीय सेवा संस्था, सह्याद्री आदिवासी ठाकर-ठाकुर समाज उन्नती मंडळ व ठाकर समाज यांच्या वतीने करण्यात आले होते. प्रास्ताविक पांडू कडाळे, सुत्रसंचालन काळू पथवे यांनी केले. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून विचार मंचावर आ.संजनाताई जाधव यांच्या सह वनपरिक्षेत्र अधिकारी शिवाजी टोंपे, पोलीस निरीक्षक रामचंद्र पवार, कृषी उत्पन्न बाजार समिती उपसभापती जयेश बोरसे, खरेदी विक्री संघाचे सभापती ज्ञानेश्वर निकम, पंचायत समिती मा.सभापती खेमा मधे, मा.उपसभापती गिताराम पवार, सेवानिवृत्त उप अभियंता सुधाकर मेंगाळ, पत्रकार अरुण थोरात, कोळवाडी सरपंच दत्ता सोनवणे, तांदुळवाडी सरपंच संभाजी गोडसे, सुनील तुपे, यांची उपस्थिति होती.

## बालरंगभूमी परिषदेतर्फे ऑगस्ट महिन्यात 'इतिहास महाराष्ट्राचा' उपक्रम

**छत्रपती संभाजीनगर :** इतिहासातील प्रेरक व्यक्तिमत्वांचे आकर्षण प्रत्येकालाच असते. ऐतिहासिक व्यक्तिमत्वांचा आदर्श बालकांपुढे असावा व त्यातून त्यांनी बोध घेत सकारात्मक विचार करावा या उद्देशाने बालरंगभूमी परिषदेच्या अध्यक्ष ॲड.निलम शिर्के सामंत यांच्या संकल्पनेतून संपूर्ण महाराष्ट्रात 'इतिहास महाराष्ट्राचा' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. यंदाच्या वर्षी या स्पर्धेकरिता छत्रपती शिवाजी महाराज - श्री शिवजन्मोत्सव ते श्री शिवराज्याभिषेक' हा विषय घेण्यात आला असल्याचे, बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष आसेफ शेख (अन्सारी) यांनी सांगितले आहे.महाराष्ट्रातील बालरंगभूमी परिषदेच्या २६ शाखास्तरावर प्राथमिक फेरी होणार असून, या उपक्रमात एकल गटात वय वर्षे ५ ते १० व वय वर्षे ११ ते १५ या वयोगटात तसेच समूह गट अशी विभागणी करण्यात आली आहे. एकल गट १ वय वर्षे ५ ते १० यांना छत्रपती शिवाजी महाराज तर एकल गट २ वय वर्षे ११ ते १५ व समूह गट यांना छत्रपती शिवाजी महाराज जन्मोत्सव ते राज्याभिषेक हा विषय देण्यात आला आहे. एकल गटात स्पर्धकांनी स्वतः छत्रपती शिवाजी महाराज आहोत किंवा त्याकाळातील कोणत्याही व्यक्तिरेखेच्या सहाय्याने छत्रपती शिवाजी महाराज अशा स्वरुपाने तर एकल गट २ व समूह गटातील स्पर्धकांनी श्री शिवजन्मोत्सव ते श्री शिवराज्याभिषेक या कालखंडातील शौर्य घटना, विविध प्रसंग, पराक्रम आदी घटनांचे संदर्भ घेत नृत्य, नाट्य, संगीत आदींचा समन्वय साधत प्रभावी सादरीकरण करावयाचे आहे. एकल गटाकरिता जास्तीत जास्त ५ मिनिटे तर समूहाकरिता जास्तीत जास्त १० मिनिटे सादरीकरणाची मर्यादा आहे. स्पर्धेत सहभागी होण्याकरिता कोणतीही प्रवेश फी नसून, प्रत्येक सहभागी व विजेत्या स्पर्धकाला सहभाग प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.प्राथमिक फेरीतील प्रत्येक गटातील प्रथम आणि द्वितीय आलेल्या स्पर्धकांची निवड अंतिम फेरीकरिता केली जाणार असून, ही अंतिम फेरी मुंबई येथे आयोजित केली जाणार आहे. अंतिम फेरीत सहभागी होणाऱ्या बालकलावंतांचा प्रवास खर्च आयोजकांकडून देण्यात येणार आहे, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या प्राथमिक फेरी करिता स्पर्धकांना गट निहाय व्हिडिओ पाठविण्याकरिताएकल गट १ करिता ९५१८३६७६५९, एकल गट २ करिता ९८२३१८१३१८ आणिसमूह गट करिता ९४२२२८५५९० हे व्हॉट्स ॲप क्रमांक देण्यात आले आहे.असे बालरंगभूमी परिषद छत्रपती संभाजीनगर शाखेचे अध्यक्ष आसेफ शेख (अन्सारी) यांनी कळविले आहे.


१० वी, १२ वी पास (कोणतीही शाखा) विद्यार्थ्यांसाठी सुवर्ण संधी

D.M.L.T

Diploma In Medical Laboratory Technology

- महाराष्ट्र पॅरामेडीकल कॉन्सीलमध्ये नोंदणी करता येते.
- सरकारी / निमसरकारी हॉस्पीटलमध्ये लॅब असिस्टंट होण्याची संधी.
- शासकीय नोकरीसाठी मान्यता प्राप्त.
- हा कोर्स झाल्यानंतर डायरेक्ट BSC ला ॲडमीशन भेटेल ११ वी, १२ वी सायन्स करण्याची गरज नाही.

डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर शिक्षण प्रसारक मंडळ संचलित

मातोश्री डॉ.कंचन शांतीलालजी देसरडा पॅरामेडिकल कॉलेज.

बीबीका मकबऱ्याच्या मागे, हनुमान टेकडीजवळ, पहाडसिंगपुरा, छ.संभाजीनगर (औरंगाबाद.)

9405109103

8830838903


## भंडाऱ्याच्या सैनिकी विद्यालयातील १६ विद्यार्थ्यांना संसर्गजन्य आजार



**भंडारा :** लाखनी तालुक्यातील केसलवाडा/वाघ येथील लक्ष्मी शिक्षण संस्थेद्वारे संचालित सैनिकी विद्यालयात १६ विद्यार्थ्यांना संसर्गजन्य आजाराची लागण झाल्याने खळबळ उडाली आहे. या विद्यार्थ्यांना सर्दी, खोकला, ताप, हगवण, उलटी आणि अंगदुखी अशी लक्षणे दिसून आल्याने त्यांना तत्काळ लाखनी येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. शाळेतील अस्वच्छतेच्या मुद्यावरून पालकांमध्ये चिंतेचे वातावरण पसरले असून, शाळा व्यवस्थापनाच्या निष्काळजीपणावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे.

दरम्यान, आजाराची लागण झालेल्या विद्यार्थ्यांना लाखनी येथील ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी भरती करण्यात आले आहे. या विद्यार्थ्यांमध्ये नक्ष अमोल कांबळे (१४), कृष्णा विलास सिडाम (१४), वेदांत घोडमारे (१४), अथर्व सतीश मेश्राम (१५), विराट विश्वेश्वर दराव (१५), मयंक रमेश उईके (१४), तनिष सुरेश मळकाम (१२), स्वप्ननंद संजय नागदेवे (१४), अर्णव गजेंद्र राऊत (१४), आर्यन टीकाराम राऊत (१४), दशमेश सुरेंद्र चौधरी (१३), रजत गोपीचंद ढोणे (१६), कल्पेश कैलास तुमसरे (१४), अमन जतिष कुंभारे (१३), श्रेयश संजय डडमल (१४) आणि सोहन सुधाकर नेवारे (१४) यांचा समावेश आहे. याशिवाय, इतर काही विद्यार्थ्यांमध्येही सौम्य लक्षणे आढळल्याने त्यांची काळजी घेण्यासाठी विशेष खबरदारी घेतली जात आहे. दरम्यान, ग्रामीण रुग्णालयात उपचार घेत असलेल्या विद्यार्थ्यांची प्रकृती स्थिर असल्याचे वैद्यकीय सूत्रांनी सांगितले आहे.